# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. १४० दिनांक २८/०५/२०२१

## एटीएम मधुन पैसे काढुन देण्याच्या बहाण्याने हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदली करुन फसवणुक करणारे सराईत आरोपीतांना पकडण्यात, गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांना यश.

-------ooooo-------

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिण्यांपासुन एटीएम सेंन्टर मधुन पैसे काढुन देण्यासाठी मदतीचा बहाणा करुन हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदली करुन फसवणुक करणारी टोळी सक्रीय झाली होती. सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे , मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरारचे पोलीस पथक असे विविध गुन्हयाचे तांत्रिक बाबी व गुप्त बातमीदार यांचेकडून मिळालेल्या माहितीवरुन आरोपीत नामे- १) रोहीत मृदुलकुमार पांडे वय २९ वर्षे, रा. पंकज यादव चाळ रुम नंबर ०३, कारगील रोड संतोषभुवन, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर. २) लखेंदर रामइकबाल पासवान वय ३१ वर्षे, रा. राजाराम चाळ रुम नंबर ४, बिहारी टेकडी रोड पोईसर, कांदीवाली मुंबई. यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडे चौकशी करता त्यांचे कब्जात विविध बॅंकेचे व वेगवेगळया इसमांची ४१ ए.टी.एम. कार्ड व गुन्हयातील फसवणुक करुन मिळविलेली २२,०००/- रुपये रोख रक्कम मिळुन आले तसेच सदर गुन्हा करण्यासाठी वापरण्यात येणारी मोटार सायकल असा एकुण १,२७,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

नमुद आरोपीत यांचे कब्जात मिळुन आलेल्या ए.टी.एम कार्ड यांची पडताळणी केली असता नमुद आरोपीत यांचा खालील गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | तुळींज पोलीस ठाणे | ६८५/२०२१ | भा.द.वी. कलम ४२०,३४ |
| २ | तुळींज पोलीस ठाणे | ६६०/२०२१ | भा.द.वी. कलम ४२०,३४ |
| ३ | तुळींज पोलीस ठाणे | ६८०/२०२१ | भा.द.वी. कलम ४२०,३४ |
| ४ | तुळींज पोलीस ठाणे | ६८६/२०२१ | भा.द.वी. कलम ४२०,३४ |
| ५ | तुळींज पोलीस ठाणे | ६८७/२०२१ | भा.द.वी. कलम ४२०,३४ |
| ६ | तुळीज पोलीस ठाणे | ५४२/२०२१ | भा.द.वी. कलम ४२०,३४ |
| ७ | तुळींज पोलीस ठाणे | ५२७/२०२१ | भा.द.वी. कलम ४२०,३४ |
| ८ | वालीव पोलीस ठाणे | ५०३/२०२१ | भा.द.वी. कलम ४२०,३४ |

नमुद आरोपीत यांचे कडे अधिक तपास करता आरोपीत यांनी वालीव, तुळींज पोलीस ठाणे हद्दीत अश्याच प्रकारे अनेक गुन्हे केले असल्याची माहिती दिली आहे.

नमुद आरोपीत हे पुढील कारवाई करीता तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ६८५/२०२१ भा.द.वी. कलम ४२०, ३४ या गुन्हयात तुळींज पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आलेले आहेत.

सदरची कामगिरी श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश भागवत, पो.ना/ मनोज चव्हाण, पो.ना/ प्रदीप टक्के, पो.ना/ मुकेश तटकरे, पो.ना./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.शि/ अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, यांनी पार पाडली आहे.

----------ooo-----------

